शिक्षण व्हावे चैतन्यदायी

(प्रा. विवेक पोंक्षे यांचे शिक्षण चिंतन)

शिक्षण व्हावे चैतन्यदायी

(प्रा. विवेक पोंक्षे यांच्या
शिक्षणविषयक साहित्याचे संकलन)

शैक्षणिक उपक्रम संशोधिका
ज्ञान प्रबोधिनी

© कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी

प्रकाशक
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०
contact@jnanaprabodhini.org

संकलन
मृण्मयी वैशंपायन

मुखपृष्ठ व आतील चित्रे
मयुरा दातार, निशिगंधा खळदकर

अक्षरजुळणी व मुद्रण
प्रबोध संपदा,
१२४८, शुक्रवार पेठ,
पुणे – ४११००२

मूल्य : ₹ १००/–

प्रस्तावना

श्री. विवेकराव पोंक्षे हे संवेदनशील, चिंतनशील आणि कृतिशील शिक्षक होते. त्यांच्या संवेदनशीलतेमुळे सर्वात उपेक्षित विद्यार्थी गट शोधून त्या गटापर्यंत जीवनदायी शिक्षण पोचवणारे एक कार्यकर्ते ते बनले होते. अरुणाचलातील विद्यार्थी असोत, पडसऱ्यातील विद्यार्थी असोत, ऊस तोडणी मजुरांची मुले असोत, नागरी वस्त्यांमधली मुले असोत किंवा छोट्या छोट्या वाड्या वस्त्यांमधील ग्रामीण मुले असोत, या सर्वांपर्यंत शिक्षण पोचवणाऱ्या उपक्रमांमध्ये ते आपणहून सहभागी व्हायचे. काही उपक्रमांचे ते निर्मातेही होते.

भौतिक शास्त्रातील गुणवत्ता यादीतील उच्च पदवीधर असल्यामुळे ते प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनाही आव्हानात्मक प्रकल्प देऊ शकायचे आणि अशा विद्यार्थ्यांच्या स्वयंस्फूर्त प्रकल्पांमध्ये स्वतःचे काही योगदानही करू शकायचे. त्यांच्या चिंतनशीलतेतून ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील काही शे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना चित्रपट, नाट्य, साहित्य, विज्ञान, अभियांत्रिकी, भूगोल, इतिहास अशा विविध विषयांमध्ये भविष्याचा वेध घेणारे अभ्यास विषय ते सुचवत राहायचे. एकदा त्यांनी सहज उल्लेख केला होता की Ph.D किंवा त्यानंतरचे संशोधन करणाऱ्या ३५० विद्यार्थ्यांशी माझा फेसबुक वर संवाद चालू असतो. सरस्वतीपूजन, अभिव्यक्ती, गुणवत्ता विकास, स्वयं अध्ययन, भविष्यवेधी प्रकल्प, समस्या परिहार करणारे प्रकल्प, संग्रहात्मक प्रकल्प, सहाध्याय दिन, अशा ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील अनेक अभिनव शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी आपल्या प्राचार्य पदाच्या १८ वर्षाच्या काळात भर घातली.

त्यांच्या प्राचार्य पदाच्या शेवटच्या वर्षांमध्ये आणि नंतरच्या काळामध्ये भावी काळातील शिक्षणाचे प्रधान माध्यम म्हणून त्यांनी संगणकाचा किती विविध प्रकारे उपयोग होऊ शकेल याचा अभ्यास करायला सुरुवात केली होती. ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतील साधन केंद्रातर्फे संगणकाद्वारे जिवंत प्रक्षेपण, Applications ची निर्मिती, चित्रफितीद्वारे व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांसाठी प्रश्नक्पेढ्यांची निर्मिती, अशा अनेक प्रयोगांना त्यांनी चालना दिली होती.

इयता ६ वीच्या विद्यार्थ्यांना कोकणची भौगोलिक रचना दाखवण्यासाठी अभ्यास सहलीला नेणे, इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांना चित्रपट रसग्रहण शिकवणे, इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सज्जनगडावर विद्याव्रत तयारीची निवासी शिबिरे योजणे, इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मुंबईच्या TIFR मध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञांची व्याख्याने योजणे, १० वीच्या विद्यार्थ्यांना छत्तीसगढच्या वनवासी भागातील प्रश्न दाखवण्यासाठी अभ्यास दौरा काढणे, अशा अनेक उपक्रमांमधून त्यांची प्रयोगशील वृत्ती दिसून आली.

त्यांच्या या प्रचंड कृतिशीलतेमुळे त्यांचे कर्तृत्व ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या किंवा शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या चौकटीत मावणे शक्यच नव्हते. त्यामुळे बाल विज्ञान चळवळीच्या महाराष्ट्रातील संस्थापक गटामध्ये ते होते. अनेक शाळा व शिक्षण संस्थांच्या सल्लागार मंडळावरती त्यांना आवर्जून बोलावले जायचे. महाराष्ट्र सरकारच्या यशदा या प्रशिक्षण संस्थेत आणि IISER सारख्या संस्थांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी त्यांना साधनव्यक्ती म्हणून बोलावले जायचे. विवेकानंद केंद्राच्या आसाम-अरुणाचल प्रदेशातील शाळांतील शिक्षक प्रशिक्षणालाही ते जायचे आणि अरुणाचल प्रदेशातील शाळांमधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी 'विवेक इन्स्पायर' या प्रकल्पाची आखणी व संचालनही त्यांनी केले होते. दुर्गम प्रदेशातील शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान प्रयोग पोचावेत यासाठी 'ज्ञान सेतू' सारख्या प्रकल्पाची संकल्पना मांडली व आपल्या तरुण विद्यार्थ्यांच्या द्वारे ७-८ वर्षे यशस्वीपणे राबवली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शाळांसाठी 'छोटे सायंटिस्ट' हा प्रकल्प त्यांनी संकल्पिला. श्री. रवी पंडित या ज्येष्ठ उद्योजकांचे सक्रिय सहकार्य मिळवून तो यशस्वीपणे चालवला. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने 'नवोदय विद्यालय समिती'च्या सदस्य मंडळावर त्यांची निवड केली. ही त्यांच्या सर्व शैक्षणिक चिंतन व कर्तृत्वाला मिळालेली शासनमान्यता होती. त्यापूर्वीच मातृमंदिर विश्वस्त संस्थेने दिलेल्या 'गुरुगौरव' पुरस्काराच्या रूपाने त्यांना समाजमान्यताही मिळाली.

ते उत्तम शिक्षक होतेच, पण त्याबरोबर उत्तम वक्ते व लेखकही होते. ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक भूमिका, कार्यपद्धती व उपक्रम यांची मांडणी त्यांनी अनेक व्यासपीठांवरून भाषणरूपाने आणि नियतकालिके आणि स्मरणिकांमधून लेखांच्या

रूपाने केली होती. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या काही भाषणांचे व लेखांचे संकलन प्रकाशित होत आहे. त्यामध्ये 'प्र'शिक्षक' या शिक्षकांसाठीच्या नियतकालिकासाठी लिहिलेली मनोगत रूपातील काही संपादकीये आहेत. निवडक शैक्षणिक उपक्रमांसंबंधी लिहिलेले अनुभव आहेत आणि विविध विषयांवरचे चिंतन व शिक्षकांसमोर केलेले आत्मकथनही आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रयोगशील आणि वेगळी वाट चोखाळू इच्छिणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण संस्थाचालकांना या संकलनातून त्यांच्या उपक्रमांसाठी काही प्रचोदना मिळू शकेल असा मला विश्वास वाटतो.

डॉ. गिरीश बापट
संचालक,
ज्ञान प्रबोधिनी

अनुक्रमणिका

❖ **शिक्षण विचार**

१. शिक्षण व्हावे चैतन्यदायी
२. अध्ययन अनुभवांतून ज्ञाननिर्मिती
३. वैज्ञानिक दृष्टिकोन
४. अभिव्यक्ती विकसन
५. भारतातील प्रयोगशील शाळा
६. मुक्त विद्या केंद्र

❖ **कृतिशील शिक्षण**

१. सहाध्यायदिन
२. अनोखे सरस्वतीपूजन
३. तंबू शिबिर
४. विक्री उपक्रम
५. शिकता शिकवता
६. संग्रह करता करता शिकूया!
७. पाठांतर
८. सर्वंकष मूल्यमापन

❖ **'प्र'शिक्षक च्या संपादकीय पानांवरून..**

१. मनुष्यघडणीची प्रयोगशाळा
२. शिक्षक घडत असताना
३. जीवनगामी शिक्षण
४. चळवळ – शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी!
५. शिक्षणातील स्वायत्तता
६. केल्याने देशाटन..
७. उद्योजकतेसाठी शिक्षण

❖ **घडता घडविताना..**

'ज्ञान प्रबोधिनी-एक नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग' या सूत्रवाक्यानुरूप ३५ वर्षे शैक्षणिक प्रयोगांची रचना व नेतृत्व करणारे प्राध्यापक विवेक पोंक्षे यांनी मांडलेल्या शिक्षणविषयक सूत्रांचे आणि प्रयोगांच्या अनुभवांचे हे संकलन.

पोंक्षे सर नेहमी म्हणत, 'Motivation first! आनंददायी शिक्षणाचा अर्थ शिक्षण सोपे करणे असा नसून, शिक्षण कितीही अवघड असले तरी त्यासाठी कष्ट घेताना आनंद वाटणे हाच होय. शिक्षकाचे आपल्या विद्यार्थ्यांवर खूप प्रेम हवे. ती आनंददायी शिक्षणाची दिले अपहिली पायरी आहे. शिक्षकाने फक्त आपल्या विषयात रममाण होऊन चालणार नाही तर त्याचे अध्यापन विद्यार्थीकेंद्री असले पाहिजे. असा शिक्षक ज्याने स्वतःचे भावशविश्व विद्यार्थ्यांना खुले करून ाहे त्याचा प्रवास शिक्षकाकडून गुरूकडे होतो.'